MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३३८ | शुक्रवार दि.३० ऑगस्ट २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -338 | FRIDAY DT.30 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |





## गोरगरीब लोकांना योजनेत समाविष्ठ करुन त्यांना तात्काळ राशन पुरवठा उपलब्ध करा-फारुख सय्यद

माजलगांव (प्रतिनिधी)

तालुक्यातील व शहरातील  गेल्या कित्येक वर्षापासुन माजलगांव तालुक्यातील मजुर, शेतमजुर, विदवा, परितक्त्या असे लोकांना जबरदस्तीने ते शेतकरी नसतांना शेतकरी -झङ या योजनेत समाविष्ट करुन त्या लोकांना राशनपासुन वंचित ठेवुन त्यांची फसवणुक करण्यात आली आहे. व कित्येक लोक दररोज राशन कार्डमध्ये नाव वाढविण्यासाठी आपल्या कार्यालयात सारखे चकरा मारत आहे. तसेच नविन डाटा इन्ट्री बंद आहे असे बोर्ड लावले जातात आणि सांगण्यात येते सध्या झक्क योजनेत स्टांक नाही असे सांगुन गोर-गरीब लोकांना राशनपासुन वंचित ठेवण्यात येत आहे.तरी  गोर-गरीब लोकांना झक्क योजनेत समाविष्ठ करुन राशन उपलब्ध करुन द्यावा. अशी मागणी करण्यात आली होती परंतु तहसील कार्यालय कडुन अद्याप कोणतीही दाखल घेण्यात आली नसल्याने आज तहसील कार्यालय समोर  बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.त्यावेळी सर्व राशन धारांनी आंदोलन माध्ये पाठिंबा दर्शविला आहे

# बीडच्या जन सन्मान यात्रेत दिसून आले

# अजित पवारांची राष्ट्रवादी म्हणजे टांगा पलटी घोडे फरार





बीड (प्रतिनिधी)

बीडच्या जन सन्मान यात्रेनिमित्त महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री राष्ट्रवादीचे सर्वेस्वार अजित दादा पवार यांनी काल बीड येथे बीड शहरात आगमन झाले या जनसमान यात्रेच्या निमित्ताने अजित पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांमध्ये अत्यंत मोठी गटबाजी स्पष्टपणे दिसून आली आहे अजित पवार गटाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये गटबाजी दिसून आल्यामुळे उपजिल्हाप्रमुख तालुका अध्यक्ष वी जयंती चे तालुका अध्यक्ष शहराध्यक्ष मागासवर्गीय समाजातील पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी अजित दादांकडे ये न टाळ तर काही पदाधिकाऱ्यांनी बीड पोलीस मुख्यालयाचे हेलिपॅड वरती अजित दादांचे स्वागत केले

- बीडचा आमदार ठरविण्याची भाषा करणाऱ्यांनी अजित पवारांची हेलिपॅड वर सत्कार करत उघड नाराजी दाखवली
- अजित पवारांना येणाऱ्या बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभेमध्ये राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून
- धनंजय मुंडे सह अन्य जणांना डोकेदुखी ठरणार
- अजित दादा दुसऱ्यासाठी खड्डा खणला तर आपणच त्यात पडतो ही जुनी मन आहेच
- योगेश क्षीरसागर आणि धुरा सांभाळली पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी योगेश भैय्यांकडे दिले होते नियोजन ते यशस्वीरित्या पार पाडले
- बीडचा आमदार ठरविणारे नेमकं कोणत्या कारणामुळे अजितदादाच्या कार्यक्रमाकडे फिरवली पाठ

अजित पवारांनी बीडच्या राष्ट्रवादीतील अंतर्गत गटबाजी वर लवकरात लवकर निर्णय घ्यावा अन्यथा पक्ष फुटी ला सुरुवात होणार

**खरे परंतु त्या ठिकाणावरून बीडचा आमदार फिरण्याची भाषा करणारे अजित पवार गटाच्या नगरसेवक पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम स्थळी न जाण्याचा निर्णय घेतला जन समाज यात्रेकडे व भाषणाकडे पाठ फिरवले यांनी पदाधिकाऱ्यांनी दिसून आलेली आहे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार काल जल सन्मान यात्रेच्या निमित्ताने बीड शहरात आले होते या निमित्त मागील दोन दिवसापूर्वी पदाधिका कार्यकर्त्यांमध्ये जोरदार तयारी सुरू होतील**

परंतु शहराच्या ठिकठिकाणी स्वतःचे बॅनर लावण्यात आले मात्र काल सकाळी अचानक पक्षाच्या गटबाजी दिसून आल्यामुळे अजित दादा राष्ट्रवादीचे उपजिल्हाप्रमुख पटेल नाईकवाडे बीड तालुकाध्यक्ष महादेव उबाळे यांनी भेट घेत त्या ठिकाणी त्यांचा सत्कार केला व कार्यक्रम स्थळी गेले नाहीत त्यामुळे बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट यांच्यामध्ये आज सुद्धा गटबाजी दिसून आल्यामुळे जनतेमध्ये ब्रह्म निर्माण झालेले आहेत तर डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्यामुळे संबंधित गटबाजी झाल्याची चर्चा आहे कारण बबनरावजी गवते यांच्या मुलाला म्हणजेच बळीराम गवतेला आमदारकीचा तिकीट पाहिजे म्हणून ही गटबाजी असल्याची चर्चा उघड आहे व डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना बळीराम गवते बबन गवते नाईकवाडे फारुख पटेल हेही या गटांमध्ये सामील आहेत म्हणून या गटाचा विरोध आहे.

तर बीडच्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे टांगा पलटी घोडे फरार अशी चर्चा यावेळी काल बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील मल्टीपर्पज ग्राउंड वरती सभेच्या ठिकाणी लोकांच्या तोंडून ऐकायला मिळाले आहे.

## तय्यब भाई अजितदादांच्या गुड बुक मध्ये

### तय्यबभाईनी दिलेली टोपी मुंबईपर्यंत अजित दादा सोबत घेऊन गेले.

बीड विधानसभेमध्ये लोकप्रिय होत चाललेले भावी आमदार म्हणून ज्यांच्याकडे पाहिलं जातं असे पत्रकारितेतील मोठे नाव असलेले सर्वांना आवडतं नेतृत्व असलेले सर्वांच्या सुखदुःखामध्ये धावून येणारे साय बीड रिपोर्टरचे संपादक तय्यब भाई यांनी अजित दादा यांचा खास टोपी देऊन फुलाचा हार घालून पुष्पगुच्छ देत सत्कार केला यावेळी अजित दादांना दिलेली टोपी ही खूप आवडली आणि ते तय्यब भाई चे कौतुक हे केले व  समाजबांधवांच्या प्रश्नावर ती व बीड विधानसभेच्या प्रश्नावरती संवाद साधला. त्यानंतर हे तय्यब भाशी सवाद साधला हेलिपॅड पासून ते कार्यक्रम स्थळी ही पर्यंत दादांनी टोपी डोक्यावर ठेवली कोणीतरी भेटला तरी सांगायचे तय्यब भाई टोपी दिली आहे खूप छान वाटते दादांनी  टोपी घातल्यामुळे खूप जणांनी कौतुकी केले व्यासपीठावर त्यांना फेटा बांधण्यात आला मात्र कार्यक्रम संपल्यानंतर परत निघत असताना पालकमंत्री धनंजय मुंडेनी तय्यब भाईनी दिलेली टोपी दादांच्या हाती दिली व दादांनी मोठ्या आवडीने मोठ्या मनाने तय्यब भाई ने स्वागतात दिलेली टोपी पुन्हा आपल्या डोक्यावरती घातल्याने तय्यब भाई समर्थकांसह बीड मधील अनेक जणांचे मन जिंकले आहेत बीडमधून बाहेर निघेपर्यंत टोपी दादांच्या डोक्यावर होती तय्यद भैय्याने स्वागताला दिली टोपी अजित दादांना चांगलीच भावली आहे नक्कीच अजित दादा या टोपी मुळे तय्यब भाईला आमदारकीचं तिकीटही देऊ शकतात अशी ही चर्चा नागरिकांमध्ये होती. तय्यब भाईनी हेलि पॅड वरती अजित दादांचे स्वागत केले. खरोखर खास वाटले असे बिडकर म्हणाले उपमुख्यमंत्री आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवारांनी एवढी खास का वाटली असावी हेडीपॅड वर कोणी बुकेहा शाल  दिला कोणी पेन दिला तर कोणी मूर्ती दिली मात्र या स्वागता पेक्षा तर बहिणी दिली दादांना भावली बुक मध्ये दादांच्या असल्याची चर्चा बीड करांमध्ये ऐकायला मिळत आहे तर आज स्वतः अजित दादांनी सिद्ध केले की भविष्यात ये भाई बीडचे आमदार होऊ शकतात मुस्लिम समाजाचा मोठा मताचा गठ्ठा आपल्याला मिळेल तय्यब भाई ना मानणारा १८ पगड जातीतील लोकांचा गठ्ठा ही आपल्याला मिळेल त्यामुळे ते तय्यब भाई ला अजित दादा येणाऱ्या काळामध्ये नक्कीच विचार करतील अशी अपेक्षा बीड करणार आहे.




इस्लाम धर्मातील शेवटचे पैगंबर आणि संपूर्ण जगात शांतता आणि सलोख्याचा संदेश देणारे खरे तारणहार हजरत मोहम्मद साहेब यांच्या जीवन चरित्रावर बोट दाखवून वादग्रस्त विधान करणाऱ्या रामगिरी महाराजांना तात्काळ अटक करण्यात यावी, या मागणीसाठी आज शुक्रवारी नमाजानंतर शेकडोंच्या संख्येने मुस्लीम समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन संताप व्यक्त केला.आम्ही आमच्या पैगंबराचा अपमान अजिबात सहन करणार नाही या साठी धारूर शहर पोलिस ठाण्याच्या आवारात रामगिरी महाराज यांच्या अटकेची मागणी करत जोरदार घोषणाबाजी करत मुस्लिम बांधवांनी पोलीस ठाण्यात जाऊन निषेध व्यक्त करण्यासाठी शहर पोलीस ठाण्यात निवेदन दिले व आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी केली. रामगिरी महाराजांचा यांच्यावर मुस्लिम समाजाचा आरोप आहे की हजरत मोहम्मद साहिब यांच्या जीवन आणि चारित्र्याचे भान न ठेवता शिवीगाळ करून त्यांच्या चारित्र्यावर बोट उचलल्याचे मुस्लिम समाजाचे म्हणणे आहे.आम्ही आमच्या पैगंबराचा अपमान अजिबात सहन करणार नाही.

रामगिरी महाराजांसारखे लोक जातीय एकतेच्या या देशात विष कालवत आहेत आणि गटांमध्ये वैर आणि द्वेषाची बीजे पेरत आहेत. देशाची शांतता भंग करण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक अपमानास्पद शब्द वापरून ते समाजात उन्माद निर्माण करत आहेत. रामगिरी महाराज सारखे लोक असे विषारी विष पसरवून समाज भडकवण्याचा प्रयत्न करत असून त्यांना शासनाने तात्काळ अटक करावी अशी मागणी समस्त मुस्लिम समाजाच्यावतीने पोलिस निरीक्षक वाघमोडे यांच्या कडे करण्यात आली.

# परळी शहरात बनावट ग्रीस कारखाण्यावर स्थानिक गुन्हे शाखा, बीड ची छापेमारी

बीड (प्रतिनिधी)

परळी शहरात बनावट गिरीश कारखान्यावर बीडच्या स्थानिक पुणे शाखेची उल्लेखनीय कार्य करत छापेमारी केली यावेळी या ठिकाणी एकुण  ७,८२,०८५/- रु चा बनावट ग्रीस व इतर साहित्यांचा मुद्देमाल जप्त दि २८/०८/२०२४ रोजी स्था.गु.शा.बीड येथील पोलीस हवालदार विष्णु सानप यांना गुप्त बातमी मिळाली की, बसवेश्वर कॉलनी परळी येथे इमस नामे रियाज रहीम शेख हा त्याचे राहते घरात व घराचे परिसरात बेकायदेशिर रित्या दुचाकी व चारचाकी वाहनास लागणारे बनावट ग्रीस तयार करत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळालेवरुन सदरची माहिती मा.श्री.उस्मान शेख, पो.नि.स्थागुशा यांना दिली. त्यानंतर दिनांक २८/८/२०२४ व दिनांक २९/८/२०२४ रोजी सदर कारवाई करणेकामी श्री. उस्मान शेख पो.नि.स्थागुशा स्वत: व आपल्या अधिपत्याखालील अंमलदार व पो.स्टे.परळी शहर येथील अधिकारी व अंमलदार यांचे तसेच पुरवठा विभागाचे श्री.सुरेश डोईजड व  पंचासह परळी शहरातील बातमी ठिकाणी पोहचुन छापा टाकला असता एका घराचे शटरमध्ये एक इसम मिळुन आला त्यास नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रियाज रहीम शेख वय ३२ रा. बसवेश्वर कॉलनी बीड असे सांगितले त्यानंतर शटर व घराचे परिसरात वेगवेगळया खोलीमध्ये ऑईल व ग्रीस उत्पादने भरलेले बकेट व डब्बे दिसले सदरचे साहित्य वाहनाचे ग्रीस बनवण्यासाठी व पँकिग करण्यासाठी लागणारे साहित्य व कच्चे मेटरियल मिळुन आले त्यावरुन सदर इसमास नोटीस देवुन ग्रीस व आईल उत्पादनासाठी व पँकिगसाठी लागणारा परवाना व इतर आवश्यक कागदपत्रे दाखविण्यासाठी कळविले परंतु सदर इसमाने ग्रीस व आईल उत्पादनासाठी व पँकिगसाठी लागणारा परवानाचे कागदपत्र हजर केले नाही. तसेच जप्त मालामध्ये खचझ-ङ- िशिळींा -झ-३ त्रीशरीश चे डब्यांवर प्लॉट नं.०२ वाळुंज एमआयडीसी औरंगाबाद, तखडउज झडणड िशिळींा -झ-३ त्रीशरीश चे बकेटवर प्लॉट नं. १२, समता कॉलनी, परळी वैजनाथ जि.बीड व तखडउज झडणड ठझच् २०-थ-४० चा ऑईचे डब्यावर प्लॉट नं.१२ एमआयडीसी परळी जि.बीड असा उत्पादन, पॅकींग व विक्री साठीचा पत्ता  असलेले बकेट व डब्बे मिळुन आले आहेत. वास्तविक लोकांना फसवणुक करुन बनावटीकरण करण्याचे उद्देशाने वरील पत्ते टाकुन सदर बनावट ग्रीस व ऑईलचे उत्पादन हे बसवेश्वर कॉलनी परळी वै. जि.बीड येथे राहते घरी करत असतांना सदर इसम मिळुन आलेला आहे.

आरोपी रियाज रहीम शेख रा.बसवेश्वर कॉलनी परळी यांचे ताब्यातुन बनावट ग्रीस व आईल तयार करण्यासाठी लागणारे ग्रीस, वेगवेगळया रंगाचे पावडर, केमीकल व काळसर तेलकट उग्र वास येत असलेले पदार्थ असे एकुण ७,८२,०८५/- रु चे मुद्येमालासह बनावट ग्रीस व ऑईल हे त्याचे स्वत:चे घरात स्वयंपाक खोलीचे बाजुला तयार ठेवत असल्याने त्याने स्वत:च्या व इतरांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने ज्वलनीशिल पेट्रोलियम पदार्थ उत्पादन व साठवणुक करत असतांना साहित्यांसह मिळुन आल्याने त्याचे विरुध्द पो.स्टे.परळी शहर येथे कलम ३१८(४) भारतीय न्याय संहिता सह पेट्रोलियम पदार्थ कायदा १९३४ चे कलम २३ व जिवनाश्यक वस्तु अधिनियम क .३,७ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री. उस्मान



शेख स्था.गु.शा.बीड, पोह/विष्णु सानप,गणेश हांगे तसेच पो.स्टे.परळी शहर येथील सपोनि शिंदे, सपोनि गुट्टेवार, पोह/गिते, येलमटे, भताने व पुरवठा विभागाचे लिपिक श्री. सुरेश डोईजड यांनी मिळुन केलेली आहे.

## धोंडराई, राक्षसभूनवच्या भाजप व राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा

# बदामराव पंडितांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश

गेवराई (प्रतिनिधी)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी गेवराई तालुक्यातील आठ जिल्हा परिषद सर्कल मध्ये झंझावती दौरा करून शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला आहे. दरम्यान धोंडराई सर्कल मधील धोंडराई आणि राक्षसभुवन येथील भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेसच्या असंख्य कार्यकर्त्यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. शिवसेनेच्या वतीने गेवराई तालुक्यात शिव संपर्क अभियान राबविण्यात येत असून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी गेल्या दहा दिवसात आठ जिल्हा परिषद सर्कलचा झंझावती दौरा पूर्ण केला आहे. यावेळी हजारो शिवसैनिक, पदाधिकारी आणि ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी महाविकास आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहण्याचे आवाहन केले आहे. दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी धोंडराई येथे झालेल्या शिवसैनिकांच्या मेळाव्यात महेंद्र



खरात, राजेंद्र शिंदे, बाबुराव शिंदे, आत्माराम साळवे, बंडू गायकवाड, रामेश्वर राठोड, सुभाष पोटफोडे यांच्यासह भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या असंख्य कार्यकर्त्यांनी बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते यशराज पंडित, माजी सभापती पंढरीनाथ लगड, माजी सभापती तुकाराम हराळे, शेख शंमुभाई, तय्यब पठाण, सिद्धेश्वरी कोकाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यापसंगी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, माझ्या तीस वर्षाच्या राजकीय प्रवासात मी प्रत्येक कार्यकर्त्याला माझ्या जीवापेक्षा अधिक जपलो आहे. कोणत्याही संकटकाळी मी तुमच्यासाठी सदैव तयार आहे. परंतु असे असताना काही कार्यकर्ते साथ देणाऱ्या ग्रामस्थांना सोडून, आर्थिक व वैयक्तिक स्वार्थासाठी गोरगरिबांना त्रास देणाऱ्याकडे प्रवेश करण्याचा चुकीचा निर्णय घेत आहेत. त्यांना जनता कधीच साथ देणार नाही. येणाऱ्या विधानसभेत गेवराई मतदार संघावर शिवसेनेचाच भगवा फडकणार असून, यापुढेही प्रत्येक निवडणुकीत सामान्य लोकांसाठी जीवाचं रान करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.पंढरीनाथ लगड, सिद्धेश्वरी कोकाटे, हरिदास कुटे, महेंद्र खरात यांची समायोजित भाषणे झाली.

कार्यक्रमास सोपानराव जाधव, संतराम काळे, भागवतराव ढेंबरे, अशोकराव वंजारे, उमराव तांगडे, शिवाजीराव मेघारे, हरिदास कुटे, संतोष धस, विठ्ठल साखरे, अतुल खरात, डॉ हबीब काझी, गोकुळ मेघारे, मच्छिंद्र सपकाळ, अनुपमा कोकाटे, अश्विनी कोकाटे, अंकुश मेघारे, बाबुराव धुमाळ, राजेंद्र नाटकर, कल्याण येवले, संदीप निकम, राजू काझी, इरफान शेख, भानुदास जाधव, पिनू हंडाळ, लहानु कांबळे, रामदास कोकाटे, अंकुश जवांजाळ, सोमनाथ धुमाळ, कैलास राठोड, भानुदास कापसे, कल्याण येवले, राहुल काळे आदींसह शिवसैनिक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लोकशाही मार्गाने चालू असलेले माजी सैनिकाचे उपोषण पोलिसांनी तोडण्याचा केला प्रयत्न

## माजी सैनिक प्रकाश वाघमारे हे १५ ऑगस्ट पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करत आहेत उपोषण

बीड (प्रतिनिधी)

माजी सैनिक प्रकाश वाघमारे हे दिनांक १५ ऑगस्ट पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसलेले आहेत, त्यांनी १५ ऑगस्ट या दिवशी पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे यांना काळा झेंडा दाखवून समोरासमोर निषेध व्यक्त केला होता. ही गोष्ट लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जण सन्मान यात्रेमध्ये माजी सैनिक, यात्रेला काळे झेंडे दाखवतील, गोंधळ घालतील अडवतील म्हणून प्रतिबंधात्मक पाऊल म्हणून त्यांचे उपोषण पोलीस प्रशासनाकडून दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११:०० च्या दरम्यान तोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. ज्यामध्ये माजी सैनिक यांनी असे म्हटले आहे की पोलीस प्रशासन हे बळजबरीने माझे उपोषण सोडत तरी पोलीस प्रशासनाने त्यांना नोटीस बदाम शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे हजर राहण्यास सांगितले होते. त्यांना पोलीस प्रशासनाने शिवाजीनगर पोलीस स्टेशन मध्ये बळजबरीने घेऊन जाण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी नकार दिला मुळे पोलीस त्यांना घेऊन जाऊ शकले नाही लोकशाही मार्गाने मी आंदोलन करत आहे मला न्याय मिळावा अशीच मागणी ते करत असल्याचे पहावयास मिळाले. माजी सैनिक प्रकाश वाघमारे हे विविध आंदोलनामुळे चर्चेत असतात , यावेळी त्यांनी जोपर्यंत प्रशासनाकडून न्याय मिळत नाही तोपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.



# रेल्वे पुलाखालच्या पाण्याचे व्यवस्था करा ; अन्यथा जलसमाधी आंदोलन करू - शिवराम राऊत

## शिवश्री कृषिमंडळ हिवरसिंगा यांच्यावतीने उप अभियंता (निर्माण) सेन्ट्रल रेल्वे, नगर यांना शिरूर तहसिलदार यांच्या मार्फत इशारा निवेदन

शिरूर (प्रतिनिधी)

हिवरसिंगा-मलकाचीवाडी रोडवरील रेल्वे वळण रस्त्याच्या पुलाखाली प्रत्येक पावसाळ्यात ४/५फुट साठुन दुधाळ वस्ती,सानप वस्ती,चव्हाण वस्ती,शिंदे वस्ती,तलाव परिसरासह मलकाचीवाडी-ढोरकरवाडी चा मुख्य रस्ता बंद होणे हि कायमचीच समस्या विद्यार्थी,शेतकरी,अबाल-वद्ध,रूग्ण यांच्यासाठी कायमचीच झाली आहे.यासाठी अनेकवेळा रेल्वे प्रशासनाला कळवलेले आहे.परंतू अद्यापही रेल्वे प्रशासनाने साठलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कायमस्वरुपी व्यवस्था करण्यासाठी शिवश्री कृषि मंडळाचे सर्व सदस्य शेतकरी,ग्रामस्थ यांच्या वतीने जिल्हाधिकारी बीड,नि.उपजिल्हाधिकारी,यांना कळवले तसेच आज पिडीत ग्रामस्थांच्या वतीने खेडकर(तहसिलदार शिरूर,) यांची श्री.,शिवराम राऊत,रामेश्वर पांडुळे,विजय शिंदे यांनी भेट घेऊन मा.उपमुख्य अभियंता निर्माण सेंन्ट्रल रेल्वे, पु.अहिल्या नगर यांना तहसिल प्रशासना मार्फत पत्र दिले असुन साठलेल्या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा होण्यासाठी ठोस उपाययोजना करावी अन्यथा साठलेल्या पाण्यातच शिवश्री कृषिमंडळ हिवरसिंगा व पीडीत शेतकरी जलसमाधी आंदोलन उभारतील यावेळी तहसिलदार श्री.खेडकर यांनी रेल्वे विभागाचे इंजि.धांडोरे यांना संपर्क करून शेतक-यांची समस्या कळवली आहे.पुढील काही दिवसांत साठलेल्या पाण्याचा निचरा करुन पाणी साठणार नाही अशी व्यवस्था करण्यात येईल असे धांडोरे यांनी कळवले आहे. यावेळी उपस्थित शेकडो शेतक-यांनी काही दिवसांची मुदत देत समस्या नाही सुटल्यास जलसमाधी आंदोलन करण्यावर ठाम असतील असे राऊत यांनी रेल्वे प्रशासनाला इशारा दिला आहे.

## ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना

# महाराष्ट्र मधील बीड जिल्ह्यातील विविध १३ मुद्द्यांवर निवेदन देण्यात आले-नितीन सोनवणे

बीड (प्रतिनिधी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कल्याण बीड, महात्मा फुले अंतर्गत छडत्रऊ - ६४१ दाखल केलेल्या फाईलचा निधी लाभार्थ्यांना तात्काळ देण्यात यावा. व १६२ कोटी अनुसूचित जातीचा वळवळेला निधी वापस देण्यात यावा. विशाल गड दंगलीतील दंगलखोरांना अटक झाली पाहिजे. नुकसान झालेल्या ग्रामसथांना त्यांची नुकसान भरपाई तात्काळ द्यावी. आरोपींना ण-झ- क्ट अंतर्गत कायदेशीर कारवाई करावी.दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत जिल्हा व तालुक्यातील भूमीहीनांना दलितांना तात्काळ जमीन द्यावी. आजच्या तारखेपर्यंत ताब्यात असलेल्या गायरान जमिनीचे तात्काळ सातबारा देण्यात यावेत.

फिलोशिप स्वाधार घरकुल योजनेचा सामाजिक न्यायचा निधी इतरत्र वळवू नये फिलोशिप सरसकट द्यावी.बीड येथील श्रेयस सोलार श्रेयस कंट्रक्शन जीएस एजन्सी श्री पंडित मोहन जगताप आणि तात्यासाहेब मोहन



जगताप यांनी शासनाच्या विविध योजनेमध्ये बोगस कामे करून कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केल्याने सण २०१८ जानेवारी ते मार्च २०२४ पर्यंत केलेल्या सर्व कामाची हेड निहाय चौकशीचे आदेश द्यावेत व दोशींवर योग्य ती कारवाई करावी. पाणंद रस्त्याच्या नावाखाली बीड जिल्ह्यामध्ये बोगस बिले उचलण्याचे चौकशी करण्याचे आदेश द्यावेत व दोषींवर योग्य कारवाई करावी उचललेला शासनाचा निधी सातबारावर बोजा टाकून वसूल करावा.

तुझ्यावर रेप झाला का असे म्हणून दलित पत्रकार मोहिनी जाधव हिचा विनयभंग जातीवाद करणारा आरोपी वामन म्हात्रे शिवसेना शिंदे गटाचा शहराध्यक्ष असून त्याच्यावर विनयभंग ट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हा दाखल झाला असून त्यावर कठोर शासन करावे.

२१/०८/२०२४ रोजी ज्या एस सी एसटी आरक्षण वर्गीकरण निर्णयाच्या संदर्भात महाराष्ट्रभर आंदोलन कर्त्यांवरील दाखल केलेले गुन्हे तात्काळ मागे घ्या.शासकीय वसतिगृहात खाजगी कंत्राटदारा मार्फत सुरक्षा कर्मचारी देण्याचा जीआर रद्द करा.पोलिसांना अवमान करणाऱ्या त्यांच्या आत्मसन्मानाला ठेच पोचणाऱ्या आमदार निलेश राणीला अटक करा.स्वामी विवेकानंद आश्रम शाळा लातूर याची मान्यता रद्द करा व मयत अरविंद खोपे वय १३ वर्ष या विद्यार्थ्यास मारणाऱ्या शिक्षकाला फाशीची शिक्षा द्या.

बीड जिल्ह्यातील कोचिंग क्लासेस वस्तीग्रह व जिल्हा परिषद शाळेमध्ये मुली वाचवण्यासाठी शासनामार्फत सीसीटीव्ही बसवण्यात यावेत अशा आशयाचे निवेदन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने देण्यात आले . या वेळी जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, बीड तालुका अध्यक्ष महिला आघाडी कावेरी जाधव, बीड तालुका उपाध्यक्ष निसार शेख, शहराध्यक्ष सोशल मीडिया उमेश पारिख, शहराध्यक्ष कोमल तुरुकमारे, दीपक वाघमारे व संघटनेतील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# भटक्या विमुक्त आदिवासी समूहाच्या विविध मागण्यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

बीड (प्रतिनिधी)

७२ व्या भटके विमुक्त आदिवासी परिषदेची संयोजन समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने भटके मुक्त आदिवासींच्या हक्कासाठी राजीव गांधी संवाद यात्रा दिनांक २८ ऑगस्ट पासून ते २३ सप्टेंबर मुंबई पर्यंत होत आहे त्याचे उद्धाटन पुणे येथील फुले वाड्यात झाले असून. ही समाधी यात्रा १८ जिल्ह्यांच्या ३० तालुक्यात जाऊन शेवटी महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथे मंत्रालयात मागण्या घेऊन जाणार आहे. यावेळी निवेदन देताना, मंगल कानडे कौशल्या कळसुले, मीरा घोडके, महादेव नरवडे, कुसुम बर्डे, परमेश्वर पवार, रामेश्वर पवार, सुदाम पवार गोरख पवार, बाबासाहेब बर्डे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



भटके विमुक्त, आदिवासी संयोजन समिती, महाराष्ट्र राज्य भटके विमुक्त, आदिवासी समुदायाच्या प्रमुख मागण्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात भटके विमुक्तासाठी स्वतंत्र मंत्रालय व त्यासाठी भटके विमुक्त जमातीतीलच मंत्र्याची नेमणूक करावी.भटके विमुक्तांची जातिनिहाय जनगणना करावी.

न्या.अशोक अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शासन निर्णयानुसार १४ विमुक्त व २८ भटक्या जमातींचा सर्वकष अभ्यास करून केंद्रशासनाकडे केलेल्या अनुसूचित जाती - जमाती मध्ये समाविष्ट करण्याबाबत केंद्र सरकारला सादर केलेल्या शिफारसीनुसार तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.व केंद्रीय पातळीवर सर्व भटके विमुक्त समुहाचे एकत्रीकरण करावे. भटके विमुक्त कल्याणासाठी पर्याप्त बजेट असावे.व आदिवासींसाठी बजेटचा कायदा करण्यात यावा.बार्टी,सारथी आणि महाज्योतीच्या धर्तीवर भटक्या विमुक्ताच्या कल्याणासाठी विचाराधीन असणाऱ्या वनार्ती ( वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था) तात्काळ कार्यान्वित करावे.अनुसूचित जाती,जमाती यांच्यावरील होणाऱ्या अन्याय अत्याचारासाठी प्रतिबंध घालण्यासाठी असणाऱ्या कायद्यामध्ये मुळ भटके,विमुक्त जातीचा समावेश करून त्यांना संरक्षणकवच मिळावे. भटके,विमुक्त जमातीचे पारंपारिक व्यवसाय जसे कि, कटलरी विकणे, भंगार गोळा करणे आदी कामासाठी त्यांना परवाने व ओळखपत्र शासकीय स्तरावरून मिळावे. भटक्या,विमुक्त जमातीतील मुलांना बालवाडी ते पदवीत्तरपर्यंतचे शिक्षण मोफत मिळावे.या समुहातील विद्यार्थ्यांना स्वतंत्र वसतिगृहे असावीत.भटके विमुक्त, आदिवासी मुलांच्या मातृभाषेचा वापर करून शिक्षण देणे,भटके विमुक्त आदिवासी समुदायातील युवक-युवतींना छात्रवृत्ती देऊन उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे.राज्याच्या सर्व विद्यापीठांमध्ये 'विमुक्त जाती व भटक्या जमातीं अध्यासन व संशोधन केंद्र' स्थापन करणे.

नागरिकत्व पुरावे मिळविण्यासाठी एक खिडकी पद्धत असावी.महाराष्ट्र शासनांनी भटके विमुक्त आदिवासी समाजाचे नागरिकत्व पुराव्यांचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासनास नागरिकत्व पुरावे काढून देण्याच्या अनुषंगाने दर दोन महिन्यांनी शिबीर / मेळावा आयोजित करून हा प्रश्न मार्गी लावावा. भटके विमुक्त ,आदिवासी समाजाच्या योगदानाला मान्यता देणे आणि त्यांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी ३१- ऑगस्ट हे 'विमुक्त दिन' म्हणून घोषित करण्यात यावे.विमुक्त दिनाच्या निमित्ताने १६ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या पंधरवड्यात राज्यभर 'भटके विमुक्त पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात यावे.समाजाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी या पंधरवड्यात शासन भटके विमुक्त्यांच्या दारी ही संकल्पना राबविणे, यामुळे समाजाच्या समस्यांवर चर्चा होईल आणि त्यांच्या कल्याणासाठी उपाययोजना करण्यास शासनाला मदत होईल.या घटकांप्रती प्रशासनास संवेदनशील करणे.महाराष्ट्र शासनने जिल्हा प्रसाशनसह सर्व ग्रामपंचायतींना आदेश द्यावे कि त्यांनी प्रत्येक जिल्हा आणि ग्रामपंचायतीच्या स्तरावर 'भटके विमुक्त आदिवासी विकास आराखडा' तयार करावा. या आराखड्यात भटके विमुक्त आणि आदिवासी समाजातील नागरिकांना जागा,घर, शिक्षण, आरोग्य, मनरेगा योजनेद्वारे रोजगार आणि वस्तीत पायाभूत सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून देण्याबाबतचे स्पष्ट नियोजन करावे.

भटके विमुक्त जमातीतील धनगर,रामोशी व वडार या स्वतंत्र जमातीसाठी असणाऱ्या महामंडळाचा लाभ सर्व भटके विमुक्त जमातीला देण्यात यावा.भटके विमुक्त, आदिवासी यांचे गायरान, गावठाण,वनजमीन व इतर निवासी व उपजिवीका अतिक्रमणांचे नियमितीकरण करण्यात यावे.

# जिल्हा परिषद आरोग्य सेविका या पदासाठी जी. एन. एम.,बी एस. सी नर्सिंग, यांना डावलून ए.एन. एम यांना घेतले



बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात आरोग्य सेविका यांनी म्हटले आहे की, जिल्हा परिषद सरळ सेवा महिला आरोग्य सेविका भरती सन २०२३- २४ मध्ये घेण्यात आली. त्या परीक्षेत पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी दिनांक दिनांक १७ जुलै २०२४ रोजी प्रत्येक जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सर्व महाराष्ट्र परिचार्या परिषदेमध्ये नोंदणीकृत परिचारिका म्हणजे आर ए एन एम/ आर जी एन एम नर्सिंग यांचा समावेश असून यापैकी अनेकांची नावे ही मेरिट यादीत आहेत. जी एन एम व बी एस सी नर्सिंग ज्यांची जिल्हा परिषदेच्या निवड प्रक्रियेमध्ये निवड झाली आहे.अशा उच्चशिक्षित उमेदवारांना देखील जिल्हा परिषद

## उच्चशिक्षितानी नोकरी करू नये का? असा सवाल उपस्थित होत आहे

महिला आरोग्य सेविका या पदासाठी पात्र करण्यात यावे.जर ही भरती फक्त ए एन एम दुसऱ्या कोणासाठी ही नव्हती तर शासनाने आमचे अर्ज का स्वीकारले अर्जामध्ये आणि जाहिरातीमध्ये ही जागा फक्त ए एन एम यांच्यासाठीच आहे असा स्पष्ट उल्लेख करायला हवा होता. तरीपण जी एन एम नर्सिंग विद्यार्थ्यांना महिला आरोग्य सेविका या पदावर घेणार नाहीत असे समजून कुठे किंवा कोणत्याही पात्र उमेदवारास लिखित स्वरूपात जिल्हा परिषद मधून तुम्हाला या कारणामुळे अपात्र करत आहोत असे अपात्रतेचे पत्र देखील दिले नाही. आज संपूर्ण महाराष्ट्रात प्राथमिक आरोग्य केंद्रात जी एन एम /बी एस सी नर्सिंग हजारो विद्यार्थी मग एन आर एच एम मार्फत कंत्राटी म्हणून पी एच सी मधील महिलांना आरोग्य सेविका या पदावरील सर्व कामे जी एन एम नर्सिंगच्या विद्यार्थ्यांकडून करून घेतले जातात तर मग जिल्हा परिषद मध्ये का नाही याची स्पष्टता करावी. आमची शासनाला एकच मागणी आहे की, शासनाने लावलेल्या गुणवत्ता व सर्व पात्र उमेदवारांना नियुक्ती करण्याचे आदेश देऊन उपक्रम करावे. अशी नम्र विनंती करण्यात आली आहे.

नुकतेच अर्ज स्वीकारून त्यांनी आमच्या परीक्षा घेतल्या व त्या परीक्षेत उच्च गुणवत्ता तात्पुरती निवड यादी नंतर कागदपत्र पडताळणी सुद्धा करण्यात आली आणि यादी मधून काही लोकांना वगळण्यात आले याचे उत्तर मिळाले पाहिजे. असे जी. एन. एम., बी. एस. सी. सर्व पात्र उमेदवार यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी

### सर्व कॉलयफाईड कॅन्डीडेट

ए एन एम साह्यकारी प्रसावीका सामान्य नर्सिंग प्रसावी का महाराष्ट्र परिषदेमध्ये परिचारिका जी एन एम नर्सिंग सहाय्यक प्रसाविका सर्व अभ्यासक्रम असून त्यांनीदेखील २०२३-२४ मध्ये झालेल्या पेपर साठी अर्ज केला होता.व त्यांच्यापैकी काही मेरिट मध्ये उत्तीर्ण झाल्या. त्यांना सर्व प्रक्रिया मध्ये वगळण्यात येईल असं कुठेही सुचित केले नव्हते.

सर्व कॉलयफाईड कॅन्डीडेट

# ओबीसी आरक्षण बचाव पदयात्रेचा शनिवारी समारोप

## प्रा. हाके, वाघमारे, शेंडगे, अन्सारींची हजेरी

### ओबीसी बांधवांनी उपस्थित राहण्याचे प्रा .चव्हाण, मुंढे वाघमोडे, पिसाळ यांचे आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : १७ ऑगस्ट २०२४ पासून गेवराई तालुक्यातील बाग पिंपळगाव येथून सुरू झालेली ओबीसी आरक्षण बचाव पदयात्रेचा समारोप ३१ ऑगस्ट रोजी वडगाव ढोक येथे होत असून या सभेसाठी मुख्य अतिथी म्हणून ओबीसी योद्धा प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथआबा वाघमारे, माजी आ. प्रकाश शेंडगे ,शब्बीर भाई अन्सारी, डॉ. नारायणराव मुंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. १७ ऑगस्ट रोजी प्रारंभ झालेली दलित, अल्पसंख्याक, ओबिसी आरक्षण बचाव पदयात्रा बाग पिंपळगाव या ठिकाणाहून सुरू झाली . या पदयात्रेच्या निमित्ताने ओबीसी बांधवांच्या वतीने काही मागण्या शासनाकडे ठेवण्यात आल्या . यामध्ये जात निहाय जनगणना, मंडल आयोगाची शंभर टक्के अंमलबजावणी, राजकीय आरक्षण रद्द करू नये, ओबीसी, दलित, अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती तात्काळ द्या, ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नका आदी मागण्याही प्रत्येक गावात शासनाला करण्यात आल्या . बाग पिंपळगाव, बेलगाव , धोंडराई, उमापूर, तळणेवाडी, गुळज, मालेगाव, गायकवाड जळगाव, चकलांबा,



तरडगव्हाण, शेकटा, बंगालीपिंपळा, खडकी, शिरसमार्ग, तरटेवाडी, शहाजानपूर ईटकुर, मादळमोही, पाडळसिंगी, हवेली ,नांदूर, खामगाव, चिंचोली ,कामखेडा ,तांदळवाडी, पेंडगाव ,बहिरवाडी , म्हाळस जवळा ,पिंपळनेर, ताडसोन्ना, केसापुरी ,नाथापूर, अमला वाहेगाव, सुलतानपूर, शिरसदेवी, जातेगाव, मारफळा, खेरडा वाडी ,तालखेड, तेलगाव, एकदरा, राजेगाव ,वारोळा, कवडगाव थडी, तपे निमगाव, टाकरवन, चोपड्याची वाडी, पांढरवाडी, रामपुरी, मनुबाई जवळा, काठोडा, डोईफोडवाडी, रोहितळ ,पांगरी, गोविंदवाडी, तलवाडा ,साडे भोगलगाव, बोरगाव थडी, अंतरवाली बुद्रुक, दैठण, लुकामसला, रेवकी देवकी, संगम जळगाव, हिंगणगाव ,आगर नांदूर ,,विठ्ठल नगर गढी, खांडवी, शिरसदेवी, अर्धमसला, पाचेगाव ,वाहेगाव, बऱ्हाणपूर, रांजणी, निपाणी जवळका, शिंदेवाडी, मिरकाळा आदी ठिकाणी १७ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान ही पदयात्रा काढण्यात आली . या पदयात्रेला ओबीसी बांधवांचा गावोगावी प्रचंड प्रतिसाद लाभला, या पदयात्रेचा समारोप गेवराई तालुक्यातील वडगाव ढोक येथे ३१ ऑगस्ट रोजी सायं ६ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये होत आहे .यावेळी ओबीसीयोद्धा प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ आबा वाघमारे, माजी आ. ओबीसी नेते प्रकाश अण्णा शेंडगे, जेष्ठ नेते शब्बीर भाई अन्सारी, डॉ. नारायणराव मुंढे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. वडगाव ढोकच्या ग्रामस्थांच्या वतीने या रॅलीचा समारोप होणार आहे . या पदयात्रेच्या समारोपाला गेवराई तालुका व पंचक्रोशीतील ओबीसी, दलित, अल्पसंख्यांक बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ,असे आवाहन ओबीसी नेते प्रा. पी. टी. चव्हाण, ह.भ. प. परमेश्वर वाघमोडे, ह.भ. प. बाबुराव शेंडगे, बजरंग सानप ,बापू गाडेकर, दादासाहेब चौधरी , अंबादास बाबा पिसाळ , बाबासाहेब घोडके व सुकाणू समितीतील सर्व सदस्यांनी केले आहे.

# अन्यायअत्याचार करणाऱ्यांची या पुढे गय केली जाणार नाही– मंगेश साळवे


**आष्टी (प्रतिनिधी)**

**आपले मुलं/मुली आंगणवाडी, शाळा, कॉलेज मध्ये शिकत असताना ती सुरक्षित राहावी म्हणून आपण अंभोरा पोलीस स्टेशन मार्फत पोलीस काका आणि पोलीस दिदी हा अभिनव उपक्रम चालु केलेला आहे. त्या अंतर्गत आपण प्रत्येक शाळेवर जाऊन विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने सखोल मार्गदर्शन करत आहोत. आपल्या मुला मुलींचे शिक्षण सुरक्षित वातावरणात पूर्ण व्हाव्हे म्हणून यापुढे त्यांच्यावर अन्याय/अत्याचार करणाऱ्याची आजिबात गय केली जाणार नाही. त्यावर कठोर कारवाई केली जाईल.असे असे प्रतिपादन अंभोरापोलीस ठाण्याचे सहाय्यकपोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी केले**

त्याचाच एक भाग म्हणून आपण प्रत्येक अंगणवाडी/शाळा/कॉलेज मधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने अंभोरा पोलीस स्टेशन मार्फत बॅनर तयार



केलेले आहे. ते बॅनर प्रत्येक शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर अथवा ज्या ठिकाणहून प्रत्येकाला दिसेल असे शाळेच्या आवरात बसवणार आहोत. सदरच्या बॅनर मुले अल्पवयीन मुला-मुलींमध्ये जनजागृती होईल तसेच असे कृत्य करणाऱ्यावर होणाऱ्या कडक कारवाईमुळे अशा विकृतीना नक्कीच जरब बसेल.



राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने बीड जिल्ह्यातील,चर्मकार समाजाचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी आज ,मा,उपमुख्यमंत्री, अजित दादा पवार, व ,बीड जिल्हा, पालख मंत्री मा,धनंजय मुंडे साहेब .यांची भेट घेतली जिल्ह्यातील चर्मकार समाजाच्या प्रश्न मार्गी लावावेत,ही,विनंती,केली व निवेदन दिले या वेळी मा,योगेश भैय्या शिरसागर यांच्या नेतृत्वाखाली भेट घेतली या वेळी जगदीश भाऊ गुरखुदे व ,सर्व मान्यवर उपस्थित होते

# आष्टी तालुक्यात समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकरी राजा सुखावला

आष्टी (प्रतिनिधी)

यावर्षी पावसाळयाच्या सुरूवातीपासूनच पावसाने समाधानकारक हजेरी लावल्याने कायमस्वरूपी टंचाईग्रस्त असलेल्या तालुक्यात पावसाळयाच्या तीन महिन्यांत १२ प्रकल्प ओव्हरफ्लो तर १० प्रकल्प निम्मे भरले असून ७ प्रकल्प जोत्याखाली असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे. उपविभागीय अधिकारी व्हि.एस.पारखे यांनी दिली. पावसाळा सुरु होऊन तीन महिन्याचा कालावधी झाला आहे.यंदाच्या वर्षी जूनच्या सुरवाती पासूनच पावसाने दमदार हजेरी लावली. तालुक्यातील कोरडेठाक पडलेले प्रकल्प आता काही ठिकाणी भरलेले असून काही लवकरच भरतील असे चित्र आहे.तालुक्यात लघू व मध्यम असे २९ प्रकल्प आहेत.त्यापैकी १२ प्रकल्प ओव्हरफ्लो झाले असून १० प्रकल्प निम्मे भरले आहेत.तर ७ प्रकल्प अद्यापही जोत्याखालीच आहेत.

तालुक्यात सहा मध्यम प्रकल्प तर २९ लघु प्रकल्प असून असलेला पाणिसाठा पुढील प्रमाणे,मेहकरी (ज्योत्याखाली),कडा(१००%),कडी दादेगांवगांव (४३%),रूटी (७४%),नागतळवाडी (६६%,), सुलेमान देवळा(१००%),तलवार (३०%),कांबळी(१००%) ,वेलतुरी (१००%),पांढरी (१००%),ब्रम्हगांव (१००%), किन्ही(१००%),चोभा निमगांव (१००%),वडगांव (७७%),केळ(५८%),बेलगांव(१००%),लोणी (२०%),पिंपळा (२८%),मातकुळी (१००%),पारगांव (जो) नं.१ (ज्योत्याखाली%),पारगांव (जो) नं.२ (३२),

शिदेवाडी (४१%),बळेवाडी (ज्यात्याखाली),खुंटेफळ (ज्यात्याखाली),कोयाळ (ज्योत्याखाली),सुलेमान देवळा (१००%),धामणगांव (१००%),पिंपरी(ज्योत्याखाली),पांढरी लघु (१००%),जळगांव (१००%) पाणी साठा आहे.तर तालुक्यात असलेले दहा कोल्हापुरी बंधा-यात ब-यापैकी पाणी साठा असल्याची माहिती पाटबंधारे कार्यालयाने दिली आहे.

# तहसीलदार खोमणे यांना त्वरिता देवी गडावरील अतिक्रमण हाताला धरून दाखवायचं का?

### २० ते २५ लाखाची जागा हडप करून आलिशान घर बांधले
### तहसीलदार खोमणे यांनी साधा तलाठी पाठवला नाही
### तहसील प्रशासनाची यात डाळ शिजली की काय ग्रामस्थातून चर्चा.

तलवाडा (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी शासनामार्फत देण्यात आलेला ब दर्जा प्राप्त झालेले तसेच नवसाला पावणारी देवी म्हणून महाराष्ट्रात परिचित असलेले आई त्वरिता देवी देवीचे मंदिर असून या ठिकाणी मंदिर परिसरात कोणी कसेही वागत असून बेशिस्तपणा दिसून येत आहे त्यातच आता तर चक्क जागा हडपण्याचा प्रकारही दिसून येत असून तहसील प्रशासन त्यात आपले हात साफ करून घेत असून मनाई आदेश असताना कोर्टाचा एकाने तर चक्क लाखो रुपये खर्च करून आलिशान घर त्यातच दुकान थाटले असून महसूलच्या जागेतच असे काम केल्यामुळे कुठलाच परवाना नसल्यामुळे घेतला नसून सगळ्या जगाला हे बांधकाम दिसत असून तहसील प्रशासनाच्या कुठल्याच कर्मचाऱ्याला का दिसत नाही यामुळे चर्चेला उधाण आले असून आता तहसीलदार खोमणे यांना अतिक्रमणात केलेले काम हाताला धरून दाखवायचं का? असा प्रश्न भाविक भक्तात होत असून हे बांधकाम तात्काळ काढण्यात न आल्यास तहसील प्रशासनाच्या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा भाविक भक्तातून होत आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा येते तीर्थक्षेत्र आई त्वरिता देवीचे मंदिर असून या ठिकाणी स्थानिक पुजारी देवी मंदिरासमोरील कित्येक वर्षापासून ट्रस्टच्या नियमानुसार दुकाने टाकलेली आहे तसा काही वार्षिक भाडे देखील देतात त्यामुळे राज्यातून भाविक भक्त या दुकानातून प्रसाद घेतात ट्रस्टच्या काही नियमानुसार दुकानदारात आणि ट्रस्ट यांनीही



दुकाने काढून त्यांच्यासाठी नवीन गाळे देवी मंदिरावरतीच ट्रस्टमार्फत तयार केलेली आहेत दुकानदार जुन्या दुकानावरून उठण्यास तयार नव्हते याचा वाद कोर्टात गेला होता कोर्टाने देखील या ठिकाणी स्टे आणला होता हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना एकाने डोंगर माझ्याच नावावर आहे असे म्हणत चक्क त्या ठिकाणी सात ते आठ गुंठे जागा पकडून त्या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कसलीच परवानगी न घेता कोर्टाचा मनाई आदेश असताना आलिशान बांधकाम केले असून कोर्टाचा आदेश देखील धुडकावून लावून चक्क लाखो रुपये खर्च करून पक्के बांधकाम केले असून नियमाचे पालन न करता सरकारी जागेत असे दुकाने टाकले असून महसूल प्रशासनाची बघ्याची भूमिका दिसत असून कायदा फक्त गोरगरिबाला दाखवायचा का? असा प्रश्न पडत आहे सदरील सातबारा वर सरकार हे नाव असून इतर हक्कांमध्ये गुरव पुजारी यांना फक्त पूजेचा मान आहे असे बांधकाम केलेले असताना देखील जेसीबी द्वारे बांधकामाचा पाया तयार करत असताना ट्रस्टच्या पदाधिकारी तसेच महसूलच्या कुठल्याच कर्मचाऱ्यांना साधी खबर सुद्धा लागली नाही का? तहसीलदार खोमणे याकडे का दुर्लक्ष करत आहे? का तहसील प्रशासनाची या ठिकाणी डाळ शिजली की काय? असे अनेक प्रश्न भाविक भक्तांना पडत असून ब दर्जा असलेल्या देवीच्या दरबारातच नियमाचे ऐशी की तैशी करत आहे अशा बांधकाम करणाऱ्या वर कारवाई न झाल्यास आंदोलन छढण्याचा इशारा भाविक भक्तातून होत आहे याकडे जिल्हाधिकारी साहेब यांनी लक्ष घालण्याची मागणी ग्रामस्थातून होत आहे

देवीच्या ठिकाणी नेहमीच भाविक भक्ताची गर्दी असते भाविकांना सुख सुविधा मिळाव्यात म्हणून त्या ठिकाणी देवी ट्रस्ट काम पाहते सरकारी जागेत अतिक्रमण होत असताना या ठिकाणी ट्रस्टचा कुठलाच पदाधिकारी पुढे आला नाही देवी मंदिरावरती होत असलेला हा सर्व प्रकार अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव सदस्य हे उघड्या डोळ्यांनी पाहत असताना देखील ट्रस्टचा कारभार किती पारदर्शक आहे हे दिसून येते साधा कुठे अतिक्रमित केलेल्या बांधकामावर कुठे अर्ज देखील दाखल केलेला नाही यामध्ये ट्रस्टने देखील हात साफ केला की काय? असा प्रश्न पडत आहे

दुकान टाकण्यासाठी नियमानुसार त्या ठिकाणी ट्रस्ट असताना देखील ज्या व्यक्तीने हे बांधकाम केले आहे त्यासाठी शासन दरबार प्रोसिजर करावी लागते त्यासाठी जिल्हाधिकारी यांचा परवाना घ्यावा लागतो तोही परवाना भेटला तर दहा बाय पंधरा अशी दुकानासाठी जागा देण्यात येते ज्या व्यक्तीने हे बांधकाम केले आहे त्या जागेचे मूल्यंकन केल्यास वीस ते पंचवीस लाखाची जागा महसूलची हडप करण्याचा प्रकार आहे जर असेच राहिले तर त्याच्या बाजूलाच दुसरा कोणीही तसेच बांधकाम करून कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा प्रकार होऊ शकतो त्यामुळे हे बांधकाम तात्काळ काढण्यात यावी तहसीलदार यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही नेमका काय प्रकार आहे ग्रामस्थातून प्रश्न पडत आहे.

# ॲड. शेख शफिक भाऊ यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा होणार





बीड (प्रतिनिधी)

एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांचा वाढदिवस दरवर्षीप्रमाणे यावेळीही विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. जिल्हाभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुकाध्यक्ष शेख एजाज खन्ना भैय्या आणि शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर यांनी केले आहे.

अजीज-ए-मिल्लत एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ यांच्या वाढदिवसानिमित्ताने दिनांक २ सप्टेंबर २०२४ सोमवार रोजी विविध सामाजिक उपक्रममाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यात रक्तदान शिबिर, राशन किट वाटप, जिल्हा रुग्णालय येथे खिचडी वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप, डोळ्यांची तपासणी शिबिर, इन्फंट इंडिया (पाली) एचआयव्ही ग्रस्त बालकांना खाऊ वाटप, बे-घर निवारा केंद्र येथे वृद्धांना जेवणाची व्यवस्था, झाडे लावा झाडे जगवा मोहीम, बांधकाम कामगारांची नोंदणी शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, हजरत शहंशाह वली दर्गा येथे गोर-गरीब लोकांना जेवणाची व्यवस्था, फुटबॉल सामन्याची स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पालीच्या बिंदुसरा धरणात १०००० मत्स्य बीज सोडणे इत्यादी सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या सर्व सामाजिक उपक्रमात एआयएमआयएम पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह जनतेचाही मोठ्या प्रमाणात सहभाग असणार आहे. तरी या सर्व उपक्रमांचा सर्व जनतेने लाभ घ्यावा असे तसेच बीडसह जिल्ह्यामध्ये विविध सामाजिक उपक्रमाने होणार आहे .असे आवाहन पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुकाध्यक्ष शेख एजाज उर्फ खन्ना भैय्या आणि शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर यांच्याकडून करण्यात आले आहे.



**राशन संदर्भातील विविध समस्येवर संभाजी ब्रिगेड चां तहसील कार्यालय वर हल्ला बोल**

**माजलगाव तालुक्यातील प्रत्येक गावात शेकडो नागरिक राशन पासून वंचित आहेत, राशन संदर्भात शेतकरी यादी मधे अनेक शेतकरी असून तहसील कार्यालय येथे अनेक वेळा कागदपत्र देऊन सुद्धा शेतकऱ्यांना अनुदान मिळत नाही. संभाजी ब्रिगेड ने आज ५१ शेतकरी लाभार्थी नागरिक यांचे कागदपत्र तहसील कार्यालय येथे जमा केले असून त्यांना तात्काळ अनुदान साठी ऑनलाईन करून देण्यात येईल अशे आश्वासन तहसीलदार साहेब यांनी दिले. अनेक नागरिक आहेत ज्यांना शेती नाही पण शेतकरी लाभार्थी यादी मधे आले आहेत त्यांचे नाव काढून त्या नागरिकांना राशन द्यावे अशी मागणी संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष यांनी केली. राशन मधे नाव लावणे नाव काढणे या प्रोसेस मधे नागरिकांना रिशिव्हड द्यावी आणि काम मार्गी लावण्यात यावे,तसेच पुरवठा विभाग मधे सी सी टी व्ही कॅमेरा तात्काळ लावला वरील सर्व प्रश्न पंधरा दिवसात मार्गी न काढल्यास संभाजी ब्रिगेड तीव्र आंदोलन करणार**

# गणेशोत्सव पार्श्वभूमीवर लिंबागणेश येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न

### आनंदोत्सव शांतता पुर्वक संयमाने साजरा करण्याचे सपोनि.चंद्रकांत गोसावी यांचे आवाहन

लिंबागणेश (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे आज दि.३० शुक्रवार रोजी सकाळी गणेशोत्सवासह येणाऱ्या सणांच्या पार्श्वभूमीवर मारोती मंदिरात नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी.चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनात शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली. चंद्रकांत रोकडे यांना लिंबागणेश येथील गणेशोत्सव दरम्यान कारवयक्रमाची सविस्तर माहिती घेतली. ग्रामस्थांनी केलेल्या सुचनांचे पोलिस प्रशासनाकडून आवश्यक ती उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.यावेळी ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.ध्वनीप्रदुषण बाबतीत काळजी घ्यावी,डिजे लावण्यास परवानगी नसुन कायद्याचे उल्लंघन झाल्यास गुन्हे दाखल करण्यात येतील.सोशल मिडीयावर




आक्षेपार्ह पोष्ट दिसुन आल्यास कायदा हातात न घेता पोलिसांकडे संपर्क साधावा, महिलांना सन्मानाची वागणूक द्यावी. गावात होर्डिंग्ज लावण्यापूर्वी ग्रामपंचायतची परवानगी घेणे बंधनकारक आहे. लिंबागणेश येथील भालचंद्र गणपतीची महिमा सर्वदूर असुन शांततेची परंपरा कायम राखत संयमाने उत्सव साजरा करावा.कुठलेही गालबोट लागु नये यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे. गणेश मंडळाचे पदाधिकारी यांनी स्वयं सेवक नेमुन नियंत्रण ठेवावे.पोलिस प्रशासन कायम आपणास सहकार्य करील असे आश्वासन दिले.यावेळी पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी उपसरपंच बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी,बाळकृष्ण मुळे, शंकर वाणी,भालचंद्र देवस्थान पुजारी श्रीकांत जोशी,वरद जोशी,ग्रां.स. श्रीहरी निर्मळ ,दामु थोरात, रमेश गायकवाड, भगवान मोरे,अशोक जाधव ,अक्षय वाणी, संतोष भोसले,पप्पु आवसरे,अशोकराजे वाणी, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, नाना वाणी, रामकिसन गिरे,आश्रुबा गिरे, सय्यद बशीर, सुखदेव वाणी, चेतन कानिटकर, औदुंबर थोरात, सुरेश निर्मळ, पत्रकार हरीओम क्षीरसागर , डॉ.गणेश ढवळे,पो.हे.ढाकणे, राऊत,डोंगरे, मुंढे आदि.उपस्थित होते.

# नॅशनल हायवे रोषणपुरी फाटा येथे मनसेचे रस्ता रोको आंदोलन-धोंडीराम जाधव

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव तालुक्यातील अनेक खेडी गावांमध्ये लोकांना ये जा करण्यासाठी रस्ताच नाही तर काही ठिकाणी थातूरमातूर रस्त्याचे काम करून गुत्तेदारासह अभियंता व कर्मचाऱ्यांचे पोट भरण्यासाठी थातूर मातूर काम केले जातात असे माजलगाव तालुक्यात असे काही ठिकाण आहेत जे की रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात आलेले नाहीत. काही ठिकाणचे खड्डे बुजवण्यात आले नाही तर काही ठिकाणी केलेल्या कामाचे काम हे निकृष्ट दर्जेत झाले आहे असे ठिकाणे खालील प्रमाणे रोशनपुरी ते छोटेवाडी रस्त्याचे मजबुतीकरण करणे नॅशनल हायवे ते रोशनपुरी नागडगाव रोड रस्त्याचे खड्डे बुजवणे नॅशनल हायवे ते रोशनपुरी दोन महिन्यापूर्वी झालेल्या डांबरीकरणाची कॉलिटी कंट्रोल तर्फे तपासणी करणे या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण निर्माण सेनेच्या वतीने उद्या सकाळी ठीक आकरा वाजता रोशन पुरी फाटा येथे रास्ता रोको करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष धोंडीराम जाधव यांनी केले आहे. या रास्ता रोकोला संबंधित गावातील सर्व नागरिकांनी व मनसेच्या कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त संख्येने हजर राहण्याचे आवाहन केले आहे. शासन प्रशासन स्तरावर गोरगरिबांसाठी



लोकांसाठी सोयी सुविधा केली जातात . त्या फक्त थातूरमातूर करून स्वतःचे उखळ पांढरे करून घेण्याचे काम प्रशासनाकडून केल्या जाते व गुत्तेदारांना पोसण्याचे काम केलं जाते याच्याच विरोधात आज दिनांक ३०/८ /२०२४ रोजी सकाळी ठीक अकरा वाजता नॅशनल हायवे रोशन पुरी फाटा येथे गेंड्याचे कातडे पांगरलेले व मरगळ आलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी हा रास्ता रोको करण्यात येणार आहे तरी जास्तीत जास्त नागरिकांनी व कार्यकर्त्यांनी या रास्ता रोकोला सहभागी व्हावे असे आवाहन गणेश वाघमारे , अविनाश गायकवाड , आबा शेटे, सुमित इंगळे व सर्व मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# मा. अजित दादा पवार काय दिलं, रस्त्यावर खडी रोडवर मुरूम आम आदमी पार्टीचा प्रश्न?

बीड (प्रतिनिधी)

बीड मध्ये काल मा. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व पालकमंत्री व कृषी मंत्री धनंजय जी मुंडे साहेब, यांची बीडमध्ये जनसंमानयात्रा करण्यात आली वर या यात्रेच्या नावाखाली जनतेचे लाखो करोडो रुपये खर्च करून तामझम करण्यात आला या बीडमध्ये लाखो करोडो रुपये खर्च करून छत्रपती संभाजी महाराज स्टेडियम बनवण्यात आले ते बीडमध्ये एकमेव नागरिकांसाठी सेवा देणारा वाकिंग ट्रॅक आहे त्या वॉकिंग चा खोदून त्याचा सत्यानास करून त्याचं खूप मोठं नुकसान करण्यात आले या एवढ्या मोठ्या खर्चातून बीडच्या जनतेला काय भेटले तर रस्त्यावर मोकळी खडी आणि मुरूम या जनसमान यात्रेचा हाच विकास आहे का असा प्रश्न बिडकर चर्चेमध्ये व आंदोलनाने सांगण्याचा प्रयत्न करत




माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी

आहे हा प्रश्न घेऊन आम आदमी पार्टी संपूर्ण बीड करांच्या दारा दारात जाऊन जनतेला अवगत करणार आहे यावेळी जनतेशी संवाद करताना यावेळी आम आदमी पार्टीचे माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष सय्यद सादेक शहराध्यक्ष रामभाऊ शेरकर मीडिया प्रमुख तालुका उपाध्यक्ष आजम खान, बीड जिल्हा अल्पसंख्याक विभाग प्रमुख रफिक पठाण, युवा नेते प्रवीण आणेराव, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रीय क्रिडा दिन साजरा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय आणि योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवारी राष्ट्रीय क्रिडा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव कमलाकर चौसाळकर हे तर योगेश्वरी प्रबोधिनीचे मार्गदर्शक रमण सोनवळकर परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नागरगोजे, रमेश सोनटकके, प्रा.डॉ.गणेश पिंगळे, मेजर एस.पी. कुलकर्णी,



बापुराव गोविंदवाड, सारंग देशपांडे, मार्गदर्शक चेतन पांडे यांच्यासह पालक, खेळाडु मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभ्यासा बरोबर क्रिडा प्रकारचाही समावेश असला तरच स्वतः चे नाव उंचावता येते असे मत कमलाकर चौसाळकर यांनी व्यक्त केले रमण सोनवळकर यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. अध्यक्षीय समारोप बर्दापुरकर यांनी केला. प्रास्तविक प्रा. प्रविण भोसले यांनी तर चत्रुभूज ढेंबरे यांनी आभार मानले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाळासाहेब वैद्य यांनी परिश्रम घेतले.

# भुजबळांनी निष्ठावंत सुभाष राऊतला एक निष्ठेचे फळ दिले

बीड (प्रतिनिधी)

अडचणीच्या काळामध्ये नेत्याच्या पाठीशी राहिलेला एकनिष्ठ निष्ठावंत म्हणून सुभाष राऊत यांची ओळख आहे भुजबळ परिवारातील सदस्य म्हणून सुभाषराव सदैव भुजबळ साहेबांच्या पाठीशी व राहण्याचे काम केले आहे राज्याचे उपमुख्यमंत्री होते तेव्हाही ते सोबत होते अडचणीच्या काळामध्ये छगन भुजबळ यांच्या पाठीशी खंबीरपणे सुभाषराव उभे होते यावेळी मात्र आता एक निष्ठेचे फळ सुभाष राऊत यांना राज्याचे मंत्रिमहोदय असलेले व छगन भुजबळ हे सुभाष राऊत यांचे राजकीय गुरु असले तरी सुभाष



राऊत हे महाराष्ट्र राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ परिवारातील एक सदस्य आहेत की खूप मोठा विश्वास आहे म्हणून तर समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुभाष राऊत यांची दोन दिवसापूर्वी राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. सुभाष रावते समता परिषदेचे सक्रिय पदाधिकारी म्हणून राज्यभर ओळखले जातात. ओबीसीच्या प्रश्नावर लढणारा एक लढवय्या कार्यकर्ता ही त्यांची ओळख असून राज्यभर ओबीसीच्या विविध प्रश्नांवर त्यांनी आवाज उठवत आंदोलने देखील केली आहेत. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची महाराष्ट्रभर ओळख आहे. राज्य अन्न आयोगाचे पद गेलं काही महिन्यापासून रिक्त असल्याने मंत्री छगन भुजबळ यांच्या शिफारशीवरून या पदाचा अतिरिक्त पदभार सुभाष राऊत यानच्याकडे देण्यात आला. या पदाला राज्यमंत्र्याचा दर्जा आहे. प्रा. सुभाष राऊत हे नगरसेवक म्हणून काम पाहिलेले आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट चे ते सदस्य देखील आहेत. या निवडीने प्राध्यापक सुभाष राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, बीडचे पालकमत्री धनंजय मुंडे, समीर भुजबळ, पंकज भुजबळ यांचे आभार मानले.

# पुन्हा निवडून द्या, सर्व योजना पुढची पाच वर्ष चालवू-ना.अजितदादा पवार

## बीडमध्ये जन सन्मान यात्रेत दिसला डॉ.योगेश क्षीरसागर यांचा जनसागर

## सभेनंतर ना.अजितदादांनी दिली डॉ.योगेशभैय्यांच्या कार्यालयास भेट

**बीड (प्रतिनिधी)**

**आगामी विधानसभा निवडणुकीत बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांना पाठबळ द्यावे. आम्हाला पुन्हा निवडून दिल्यास पुढची पाच वर्ष सध्या चालू असलेल्या लाडकी बहिण, शेतकर्यांसाठीच्या सर्व योजना सक्षमपणे चालवू. निधी कसा आणायचा हे आम्हाला माहित आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.**

बीडचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नियोजनातून जन सन्मान यात्रेचे गुरुवारी (दि.२९) आगमन झाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर अजित पवार हे बोलत होते. व्यासपीठावर प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, आ.विक्रम काळे, प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर, ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, मा.आ.जनार्दन तुपे, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर, जयसिंग सोळंके, प्रदेश उपाध्यक्ष पापा मोदी, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष प्रज्ञा खोसरे, मोहनराव ढाकणे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, रेखा फड, युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे, अल्पसंख्याक महिला जिल्हाध्यक्ष शाकेरा शेख, जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, सुभाष सपकाळ, लीगल सेल जिल्हाध्यक्ष ॲड.नागेश तांबारे, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, युवक जिल्हाध्यक्ष सुशांत पवार, विद्यार्थी शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, अजिंक्य आनेराव, सामाजिक न्याय सेलचे जिल्हाध्यक्ष आनंद सरपते, स्वयंरोजगार जिल्हाध्यक्ष विजय पोकळे, ग्रंथालय सेलचे जिल्हाध्यक्ष बालासाहेब फपाळ, युवक तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश, जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले की, हे राज्य सामान्यांचं, गरिबांच आहे. आमच्या योजनांची किंमत गरिबांनाच कळेल. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेल्यांना हे कळणार नाही. परळीत धनंजय मुंडे यांनी कृषी महोत्सव घेतला, तिथं आम्ही कांदा निर्यात बंदी करायची नाही असं सांगितलं. आम्ही बळीराजासाठी, त्याच्या घामाची किंमत मिळावी म्हणून उभे आहोत. महिला अत्याचाराला माफी नाही. दोषी कोणीही असो त्याला सोडणार नाही. आम्ही सत्तेला हपापलेले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास दैदीप्यमान आहे. त्यांच्या पुतळ्याच्या बाबतीत जे घडले ते दुर्दैवी आहे. त्या प्रकरणातील दोषींना धडा शिकवू असे ते म्हणाले. मी दहावा अर्थसंकल्प सादर करताना महिलांसाठी विशेष तरतूद करण्याचे ठरविले होते. त्यानुसार माझी लाडकी बहिण योजना



राबविली. त्याचा महिलांना लाभ मिळतोय. परंतु विरोधकांकडून अपप्रचार केला जात आहे. परंतु बहिणींना कधी फसवणार नाही. ५२ लाख कुटुंबांना ३ गॅस सिलेंडर तुमच्या अकाऊंटला पैसे देणार आहे. थेट खात्यवरच पैसे जात आहेत. शिक्षण घेण्यासाठी मुलींना १०० फी देण्याचा निर्णय घेतला आहे, असेही त्यांनी म्हटले. शासनाच्या अनेक योजनांची तपशीलवार माहिती त्यांनी दिली. याप्रसंगी महायुतीतील घटक पक्ष शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्यासह पदाधिकार्यांनी श्री.पवार यांचा सत्कार केला. प्रास्ताविक डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचलन शिप्रा मानकर, प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार ॲड.प्रज्ञा खोसरे यांनी मानले. यावेळी महिला भगिनींची लक्षणीय उपस्थिती होती. दरम्यान, सभेनंतर ना.अजितदादांनी डॉ.योगेशभैय्यांच्या कार्यालयास भेट दिली. यावेळी महायुतीच्या काही पदाधिकार्यांचीही उपस्थिती होती.

**दुचाकी रॅलीने वेधले लक्ष; हॉटेलमध्ये केला दादांनी नाश्ता!**

ना.धनंजय मुंडे, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीडमध्ये हेलीपॅडवर आगमन होताच ना.अजित पवार यांच्यासमवेत नेत्यांचे स्वागत केले. शहरातून बाईक रॅली निघाली. या रॅलीत शेकडो तरूण-तरूणी सहभागी झाले होते. यावेळी फुलांची उधळण करण्यात आली. अजितदादांनी रस्त्यात व्यापारी बांधवांसह अल्पसंख्याक समाजाचे निवेदन स्विकारले. दौर्यात सुरक्षा व्यवस्था बाजूला ठेऊन प्रसिद्ध श्री हॉटेलमध्ये जाऊन नाश्ता केला. त्यांच्या या साधेपणाने उपस्थितांमधून कौतूक झाले.

पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी यावेळी लाडकी बहीण योजनेत बीड जिल्हा राज्यात तिसर्या क्रमांकावर असल्याचे सांगितले. या सरकारने शेतकर्यांना वीज बिल माफी दिली. सामान्यांसाठी सरकारची तिजोरी खाली केली. त्यामुळेच येत्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात राष्ट्रवादीचे चार तर महायुतीचे सहा आमदार असतील अशी ग्वाही दिली.

### अजितदादांच्या माध्यमातून सामान्यांचे प्रश्न सुटले : डॉ.योगेश क्षीरसागर

जनसन्मान यात्रेतून ना.अजित पवार हे सर्वसामान्य घटकातील महिला, पुरुषांसह तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. पक्षात प्रवेश केल्यानंतर एक वर्षाच्या कमी कालावधीतही अजित पवारांच्या माध्यमातून सामान्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले. तसेच मराठा भवनासाठी निधी देण्यासह उर्दू घर, शेतकर्यांसाठी सोलार योजना, गावांमध्ये व्यायामशाळा, बीड शहरातील प्रलंबित रस्ते आणि पाणी पुरवठा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याच्या मागण्या डॉ.क्षीरसागर यांनी केल्या.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT